# पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ, सोलापूर
## व्यवस्थापन परिषदेच्या १७१ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत
## शुक्रवार, दि. २२ मार्च, २०२४ दुपारी १२:३० वा.



प्रस्तुत विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची १७१ वी बैठक (तातडीची) **शुक्रवार, दि.२२ मार्च, २०२४ रोजी दुपारी १२:३० वा.** राष्ट्रमाता जिजाऊ मॉसाहेब व्यवस्थापन परिषद सभागृहात मा. कुलगुरु यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आली होती.

सदर बैठकीस उपस्थिती खालीलप्रमाणे होती.

| अ.क्र. | सदस्याचे नांव | पद | उपस्थिती |
|---|---|---|---|
| १) | प्रा. (डॉ). प्रकाश अण्णा महानवर, मा. कुलगुरु | अध्यक्ष | उपस्थित |
| २) | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत बसवराज दामा | सदस्य | उपस्थित |
| ३) | प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| ४) | डॉ. प्रशांत मारुती पवार | सदस्य | उपस्थित |
| ५) | डॉ. वसंत गुरुशांत कोरे | सदस्य | उपस्थित |
| ६) | प्रा. (डॉ.) बाळकृष्ण जगन्नाथ लोखंडे | सदस्य | उपस्थित |
| ७) | प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार | सदस्य | उपस्थित |
| ८) | डॉ. समाधान दिगंबर पवार | सदस्य | उपस्थित |
| ९) | डॉ. सुशिल कुमार शिंदे | सदस्य | उपस्थित |
| १०) | श्रीमती पद्मजादेवी प्रतापसिंह मोहिते-पाटील | सदस्या | उपस्थित |
| ११) | श्री. महादेव दऱ्याप्पा कमळे | सदस्य | उपस्थित |
| १२) | श्री. सचिन मारुती गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १३) | श्री. सुधाकर तुकाराम सरवदे | सदस्य | उपस्थित |
| १४) | डॉ. शशिकांत हरिश्चंद्र गायकवाड | सदस्य | उपस्थित |
| १५) | डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज | सदस्या | उपस्थित |
| १६) | डॉ. अजित माधव पाटणकर | सदस्य | विनंतीनुसार अनुपस्थित |
| १७) | डॉ. नलिनी टेंभेकर, विभागीय सहसंचालक (उच्च शिक्षण), सोलापूर (मा. सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मुंबई नामनिर्देशित) | सदस्या | उपस्थित |
| १८) | डॉ. शैलेंद्र देवळाणकर, मा. शिक्षण संचालक (उच्च शिक्षण), उच्च शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे | सदस्य | अनुपस्थित |
| १९) | डॉ. विनोद मोहितकर, मा. संचालक (तंत्रशिक्षण) तंत्रशिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई | सदस्य | अनुपस्थित |
| २०) | सीए श्रेणिक हुकुमचंद शाह, वित्त व लेखा अधिकारी | निमंत्रित | उपस्थित |
| २१) | डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ | निमंत्रित | उपस्थित |
| २२) | योगिनी घारे, कुलसचिव | सदस्य-सचिव | उपस्थित |

बैठकीची सुरुवात विद्यापीठ गीताने करण्यात आली.

**स्वागत:**

कुलसचिव यांनी मा. अध्यक्ष व सर्व सन्माननीय सदस्य यांचे स्वागत केले. तसेच डॉ. श्रीकांत गणपतराव अंधारे, संचालक, परीक्षा व मूल्यमापन मंडळ यांची ही पहिलीच बैठक असल्याने त्यांचे व्यवस्थापन परिषदेच्या वतीने मा. कुलगुरु महोदय यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देवून त्यांचे स्वागत करण्यात आले.

**अनुपस्थिती:**

व्यवस्थापन परिषदेच्या या बैठकीस प्रा. देवानंद काशिनाथ चिलवंत व डॉ. अजित माधव पाटणकर यांनी ई-मेलद्वारे अनुपस्थिती कळविली होती, त्यांच्या अनुपस्थितीची नोंद घेवून मान्यता देण्यात आली.

बैठकीत खालीलप्रमाणे कामकाज झाले.

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०१ ] | १) दि. ०६ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२) दि. २२ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६९ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>३) दि. ०५ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७० व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांताची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १) दि. ०६ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६८ व्या बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला.<br>२) दि. २२ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६९ व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत सर्वानुमते कायम करण्यात आला.<br>३) दि. ०५ मार्च, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १७० व्या (तातडीच्या) बैठकीचा कार्यवृत्तांत खालील दुरुस्तीसह सर्वानुमते कायम करण्यात आला. | |
| | पान क्र.३३ व विषय क्र.५ मधील ठरावात खालीलप्रमाणे दुरुस्ती करण्यात आली. | |
| | **पूर्वीचा ठराव** | |
| | विद्यापीठातील नियमित अधिकारी व कर्मचाऱ्यांचा जादा कामाचा दर वाढविणेबाबत चर्चेअंती असा ठराव करण्यात आला की, सदरबाबत शासन निर्णयातील तरतूद पाहावी व तसे असल्यास वर्ग ३ मधील कर्मचाऱ्यांना रु.४०/- वरुन रु.६०/- प्रती तास आणि वर्ग ४ मधील कर्मचाऱ्यांना रु.३०/- वरुन रु.५०/- प्रती तास एवढा जादा कामाचा मोबदला वाढवावा. तसेच वर्ग १ व वर्ग २ यांना जादा कामाचा मोबदला शासन निर्णयानुसार देय नसल्याने तो देणे बंद करावे असे सर्वानुमते ठरले. | |
| | **दुरुस्त केलेला ठराव** | |
| | विद्यापीठ आस्थापनेवरील नियमित अधिकारी व कर्मचाऱ्यांना खालील अटींच्या अधिन राहून अतिकालीक भत्ता (Over Time) वाढविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.<br>१. अधिकारी / कर्मचारी यांच्या जादा कामाचे तास हे पहिला तास ६० मिनीट पूर्ण झाल्यानंतर व त्यानंतरचा तास हा ४५ मिनीटानंतर याप्रमाणे धरण्यात यावा.<br>२. जादा काम केल्यानंतर मिळणाऱ्या भत्त्यांची मर्यादा ही आर्थिक वर्षामध्ये २०० तास याप्रमाणे राहील.<br>३. वर्ग १ ते ४ मधील अधिकारी व प्रशासकीय कर्मचारी यांच्या अतिकालीक भत्त्यांमध्ये (Over Time) खालीलप्रमाणे वाढ करण्यात यावी.<br>४. सदरची वाढ ही दि.०१ एप्रिल, २०२४ पासून लागू करण्यात यावी असे सर्वानुमते ठरले. | |

| अ.क्र. | प्रवर्ग | दर (प्रती तास) |
|---|---|---|
| १) | वर्ग १ | ₹ ११०/- |
| २) | वर्ग २ | ₹ १००/- |
| ३) | वर्ग ३ | ₹ ९५/- |
| ४) | वर्ग ४ (वाहनचालक वगळून) | ₹ ९०/- |

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०२ ] | १. दि. १९ जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६७ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ.<br>२. दि. ०६ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्याची बाब विचारार्थ. | सभा व निवडणूका विभाग |
| ठराव: | १. दि. १९ जानेवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६७ व्या (तातडीच्या) बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली.<br>२. दि. ०६ फेब्रुवारी, २०२४ रोजी झालेल्या व्यवस्थापन परिषदेच्या १६८ व्या बैठकीच्या कार्यवृत्तांतावर केलेल्या कार्यवाही अहवालाची नोंद घेण्यात आली. | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०३ ] | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करणेबाबत महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दिनांक १३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र. १.१ ते १.१३ ची कार्यवाही पूर्ण झालेली असून सदरील प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (४) (ग) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्याची बाब विचारार्थ.** | संलग्नता विभाग |

टिपणी: महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०९ (४) (क) मधील तरतुदीनुसार नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करण्यासाठी प्रस्ताव सादर करण्याची अंतिम मुदत ही ३० सप्टेंबर अशी आहे. त्यासंदर्भात प्रस्तुत विद्यापीठाच्या दि.११/०७/२०२३ रोजीच्या परिपत्रकाच्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करणेसाठी संलग्नित महाविद्यालयांकडून ३०/०९/२०२३ पर्यंत एकूण ५८ प्रस्ताव प्राप्त झालेले होते.

दरम्यानच्या कालावधीत शासनाने दिनांक ०३/११/२०२३ रोजीच्या शासनपत्रान्वये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, तुकडी, विद्याशाखा सुरू करणेबाबत प्रस्ताव मागविण्याची मुदत दि.१५/११/२०२३ पर्यंत वाढविली होती. त्याअनुषंगाने विद्यापीठ परिपत्रक पुअहोसोविसो/संलग्नता/२०२३-२४/७७४५, दि.३१/१०/२०२३ अन्वये दि.१५/११/२०२३ पर्यंत एकूण १० प्रस्ताव प्राप्त झाले होते, असे एकूण ६८ प्रस्तावांची सविस्तर माहिती खालीलप्रमाणे आहे.

शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरू करणेसाठी (पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रम) एकूण प्राप्त प्रस्तावांचा तक्ता

| पारंपारिक अभ्यासक्रम | व्यावसायिक अभ्यासक्रम | एकूण प्राप्त प्रस्ताव |
|---|---|---|
| ६१ | ०७ | ६८ |

**(पारंपारिक अभ्यासक्रम)**

| नवीन अभ्यासपाठ्यक्रम | | एकूण | नवीन अतिरिक्त तुकडी | | एकूण | विषय | विद्याशाखा | एकूण प्राप्त प्रस्ताव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| UG | PG | | UG | PG | | | | |
| १५ | ०६ | २१ | २८ | ०२ | ३० | ०३ | ०७ | ६१ |

**(व्यावसायिक अभ्यासक्रम)**

| नवीन अभ्यासपाठ्यक्रम | | एकूण | नवीन अतिरिक्त तुकडी | | एकूण | विषय | विद्याशाखा | एकूण प्राप्त प्रस्ताव |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| UG | PG | | UG | PG | | | | |
| ०१ | ०५ | ०६ | ०१ | ०० | ०१ | ०० | ०० | ०७ |

उपरोक्तप्रमाणे प्राप्त झालेल्या प्रस्तावांवर दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयानुसार व महराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार विहीत कार्यवाही करुन प्राप्त प्रस्तावांची छाननी करण्याकामी, छाननी समिती गठीत करण्यात आलेली होती.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.१.८ च्या अनुषंगाने नियुक्त केलेल्या छाननी समितीच्या बैठका दि.२७/१०/२०२३, दि.०१/११/२०२३, दि.०८/११/२०२३, दि.१३/१२/२०२३, दि.२८/१२/२०२३ व दि.३०/१२/२०२३ रोजी डॉ. सी. जे. खिलारे यांच्या अध्यक्षतेखाली आयोजित करण्यात आल्या होत्या.

महाराष्ट्र शासन, उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.१.१३ च्या अनुषंगाने महाविद्यालयास प्रत्यक्ष भेट देवून अहवाल सादर करणेबाबत मा.कुलगुरु महोदयांनी गठीत केलेल्या तज्ज्ञ समित्यांचे (Spot Visit) अहवाल प्राप्त झाले.

सदरील छाननी समिती व तज्ज्ञ समित्यांचे अहवाल प्राप्त झाल्यानंतर दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.१.१३ अन्वये अधिष्ठाता मंडळाकडून सदर प्रस्तावांची छाननी करण्यात येवून दि.०७/०३/२०२३ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीतील ठराव क्र.४ अन्वये अहवाल स्विकारुन मा. कुलगुरु महोदयांना शिफारस केली आहे. सदरील अहवालाचे विवरणपत्र सोबत जोडले आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (४) (ग) अन्वये सदर पात्र ६४ प्रस्ताव व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह शासनाकडे दि.१ एप्रिलपर्यंत सादर करणे आवश्यक आहे.

सबब, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन अभ्यासपाठ्यक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करणेबाबत महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांची दि.१३/०९/२०१७ रोजीच्या शासन निर्णयातील मुद्दा क्र.१०१ ते १.१३ ची कार्यवाही पूर्ण झालेली असून सदरील प्रस्ताव महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (४) (ग) अन्वये व्यवस्थापन परिषदेच्या मान्यतेसह राज्य शासनाकडे पाठविण्याची बाब विचारार्थ.

ठराव: **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून नवीन अभ्यासपाठयक्रम, विषय, विद्याशाखा, अतिरिक्त तुकडी सुरु करणेबाबत महाविद्यालयांकडून प्राप्त झालेल्या प्रस्तावांस अधिष्ठाता मंडळाने दि.०७/०३/२०२४ रोजीच्या बैठकीत केलेली शिफारस महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०९ (४) (ग) अन्वये स्विकारुन ६३ प्रस्ताव राज्य शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

**तसेच सदर प्रस्तावातील अ.क्र.५८ वरील डॉ. असदुल्लाहखान कॉलेज ऑफ आर्टस, कॉमर्स ॲन्ड सायन्स, कुंभारी या महाविद्यालयाने स्वत: त्यांचा प्रस्ताव मागे घेण्याची विनंती केल्याने सदरचा प्रस्ताव वगळण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०४ ] | **भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर या महाविद्यालयाचे नवीन जागेत स्थलांतर करणेबाबत गठित करण्यात आलेल्या प्रत्यक्ष पाहणी (Spot Visit) समितीचा अहवाल स्विकारुन अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस विचारार्थ.**<br>टिपणी: मा.अध्यक्ष, भाई छन्नुसिंग चंदेले स्मृती केंद्र यांनी भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर हे महाविद्यालय १६३ - अ, रेल्वे लाईन्स, जुना एम्प्लॉयमेंट चौक, सोलापूर या ठिकाणी कार्यरत असून सदरील महाविद्यालय नवीन सर्व्हे नं. १०३ (जुना सर्व्हे नं.१०५) या ठिकाणी स्थलांतर करण्यासाठी परवानगी मिळण्यासाठी दिनांक ०१/०९/२०२३ अन्वये विनंती केली होती. त्यास अनुसरुन दि. १५/०९/२०२३ रोजी रितसर कार्यालयीन टिपणी सादर करुन महाविद्यालयास नवीन जागेत स्थलांतर करण्यासंदर्भात महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ मधील तरतुदीनुसार आवश्यक त्या कागदपत्रासह प्रस्ताव सादर करण्याबाबत दि.२२/०९/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते. त्यास अनुसरुन महाविद्यालयाने दिनांक १२/१०/२०२३ व २७/१०/२०२३ अन्वये विहित शुल्कासह प्रस्ताव सादर केलेला आहे. त्याअनुरोधाने दि.०४/१२/२०२३ रोजी कार्यालयीन टिपणी सादर करुन महाविद्यालयास स्थलांतर संदर्भात नवीन ठिकाणचे अंतर, भौतिक सुविधा इ. बाबत प्रत्यक्ष पाहणी (Spot Visit) करण्यासाठी समितीचे गठन करुन महाविद्यालयास व समितीस दि.२६/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले होते.<br>१) डॉ. आर. एस. हिरेमठ - अध्यक्ष<br>२) श्रीमती डॉ. व्ही. व्ही. महाजन - सदस्या<br>३) डॉ. पी. पी. तपकिरे - सदस्य<br>त्यानुसार समितीने दिनांक १३/०१/२०२४ रोजी प्रत्यक्ष पाहणी करुन त्यांचा अहवाल विद्यापीठास सादर केलेला आहे. त्यामध्ये शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर या महाविद्यालयाला नवीन जागेत स्थलांतर करण्यास परवानगी देण्यात यावी, अशी शिफारस समितीने केली आहे.<br>दरम्यानच्या कालावधीत प्रस्तुत विद्यापीठाकडून दिनांक ०८/१२/२०२३ रोजीच्या पत्रान्वये सदरील महाविद्यालय हे समाजकल्याण या विभागाशी निगडीत असल्याने त्याचे आर्थिक दायित्व (उदा. कर्मचाऱ्यांचे वेतन व इतर बाबी) हे समाजकल्याण विभागाकडून करण्यात येत असल्याने महाविद्यालयाचे स्थलांतर करणेकामी समाजकल्याण विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक असल्याचे महाविद्यालयास कळवून त्याची प्रत मा. सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण विभागास देण्यात आलेली होती. त्यास अनुसरुन प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण, पुणे विभाग, पुणे यांनी मा. सहआयुक्त (शिक्षण), समाज कल्याण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना ना-हरकत प्रमाणपत्र मिळणेबाबतचा प्रस्ताव सविनय सादर केलेला आहे. याची माहिती सहपत्रासह प्र.प्राचार्य, भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर यांनी दि.२६/०२/२०२४ रोजीच्या पत्रासोबत सादर केलेले आहे. | संलग्नता विभाग |

| | | |
|---|---|---|
| | उक्त प्रकरणी प्रशासकीय कार्यवाही सुरु असतानाच महाराष्ट्र शासनाच्या महाराष्ट्र शासन, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचे शासन निर्णय क्र. सकाम-२०२३/प्र.क्र.१९/सामासु, दि.२९/०२/२०२४ अन्वये "समाजकार्य महाविद्यालय (बी.एस.डब्ल्यु / एम.एस.डब्ल्यु. अभ्यासक्रम)" हा विषय सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागातील सामासु कार्यासन हाताळीत आहे. परंतु उच्च व तंत्र शिक्षण विभागामार्फत महाविद्यालयीन शैक्षणिक पध्दतीची अंमलबजावणी तसेच शैक्षणिक विषयक कामकाज करण्यात येत असल्याने मा.मंत्रिमंडळाच्या दि. १४ फेब्रुवारी, २०२४ रोजीच्या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयान्वये, सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाकडील "समाजकार्य महाविद्यालय (बी.एस.डब्ल्यु. / एम.एस. डब्ल्यु. अभ्यासक्रम)" हा विषय उच्च व तंत्रशिक्षण विभागाकडे हस्तांतरीत करण्यास दिलेल्या मान्यतेस अनुसरुन सदर विषय या विभागाकडून उच्च व तंत्र शिक्षण या विभागाकडे हस्तांतरीत करण्यास याद्वारे शासन मंजूरी देण्यात येत आहे, असा निर्णय घेतला असल्याने सद्यस्थितीत उक्त प्रकरणी समाजकल्याण विभागाचे ना-हरकत प्रमाणपत्र घेण्याची आवश्यकता नाही. सदरची बाब दि.०७/०३/२०२४ रोजीच्या अधिष्ठाता मंडळाच्या बैठकीत सादर केली असता, खालीलप्रमाणे ठराव पारित करण्यात आला आहे<br>"भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर या महाविद्यालयाचे नवीन जागेत स्थलांतर करणेबाबत गठित करण्यात आलेल्या प्रत्यक्ष पाहणी (Spot Visit) समितीचा अहवाल व्यवस्थापन परिषदेकडे वर्ग करण्याबाबत सर्वानुमते शिफारस करण्यात आली ".<br>सबब, भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर या महाविद्यालयाचे नवीन जागेत स्थलांतर करणेबाबत गठित करण्यात आलेल्या प्रत्यक्ष पाहणी (Spot Visit) समितीचा अहवाल स्विकारुन अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | |
| ठराव: | **भाई छन्नुसिंग चंदेले कॉलेज ऑफ सोशल वर्क, सोलापूर या महाविद्यालयाचे नवीन जागेत स्थलांतर करणेबाबत गठित करण्यात आलेल्या प्रत्यक्ष पाहणी (Spot Visit) समितीच्या अहवालावर अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११८(३) मधील तरतुदीनुसार शासनाकडे मान्यतेसाठी प्रस्ताव पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०५ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार वित्त व लेखा अधिकारी या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास मंजूर असलेल्या वित्त व लेखा अधिकारी या पदावर कार्यरत असलेले सीए श्रेणीक शाह यांची मुदत दि.२९/०५/२०२४ रोजी संपणार असल्याने सदर पदाची जाहिरात दै. लोकमत व दै. टाईम्स ऑफ इंडियाच्या दि.०६/०३/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, दै. लोकसत्ता (एक्सप्रेस करिअर वेस्ट पॅकेज) च्या दि.०८/०३/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.११ ते १७ मार्च, २०२४ रोजीच्या युनिव्हर्सिटी न्युजच्या साप्ताहिकेत, विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून आवेदनपत्र सादर करण्याची अंतिम मुदत दि.१०/०४/२०२४ पर्यंत आहे.<br>सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन वित्त व लेखा अधिकारी या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. सदर निवड समितीला अनुसरुन १०५ २) (ड) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.<br>• व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने वित्त व लेखा अधिकारी या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२)(ड) मधील तरतुदीनुसार वित्त व लेखा अधिकारी या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२)(ड) मधील तरतुदीनुसार वित्त व लेखा अधिकारी या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्या डॉ. श्रीमती आयेशा मोहम्मद सादिक रंगरेज यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०६ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास मंजूर असलेल्या संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदावर कार्यरत असलेले डॉ. सचिन श्यामसुदर लड्डा यांनी दिलेला राजीनामा स्विकारुन त्यांना दि.२६/१०/२०२३ रोजी संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदावरुन सेवामुक्त करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन सदर रिक्त पदाची जाहिरात दै.लोकमत व दै.टाईम्स ऑफ इंडियाच्या दि.०६/०३/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, दै.लोकसत्ता (एक्सप्रेस करिअर वेस्ट पॅकेज) च्या दि.०८/०३/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.११-१७ मार्च, २०२४ रोजीच्या युनिव्हर्सिटी न्युजच्या साप्ताहिकेत, विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून आवेदनपत्र सादर करण्याची अंतिम मुदत दि.१०/०४/२०२४ पर्यंत आहे.<br>सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. सदर निवड समितीला अनुसरुन १०५ २) (ड) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.<br>• व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५(२)(ड) मधील तरतुदीनुसार संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्य प्राचार्य डॉ. निवृत्ती बाबुराव पवार यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०७ ] | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास मंजूर असलेल्या संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण या पदावर कार्यरत असलेले डॉ. सुरेश किसनराव पवार हे नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त झाल्याने त्यांना दि.३१/०८/२०२२ रोजी संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण या पदावरुन सेवामुक्त करण्यात आले आहे. त्यास अनुसरुन सदर रिक्त पदाची दि.१९/११/२०२२ रोजी जाहिरात प्रसिध्द करुन विहीत प्रक्रिया केली असता निवड समितीने पात्र कर्मचाऱ्यांपैकी एकही उमेदवाराची शिफारस न केल्यामुळे संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण हे पद रिक्त आहे.<br>उक्त नमूद बाब विचारात घेता, प्रस्तुत विद्यापीठातील रिक्त असलेल्या संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण या पदाची जाहिरात दै. लोकमत व दै.टाईम्स ऑफ इंडियाच्या दि.०६/०३/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, दै.लोकसत्ता (एक्सप्रेस करिअर वेस्ट पॅकेज) च्या दि.०८/०३/२०२४ रोजीच्या आवृत्तीमध्ये, Association of Indian Universities, New Delhi यांच्या दि.११-१७ मार्च, २०२४ रोजीच्या युनिव्हर्सिटी न्युजच्या साप्ताहिकेत, विद्यापीठाच्या व महाराष्ट्र शासनाच्या अधिकृत संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली असून आवेदनपत्र सादर करण्याची अंतिम मुदत दि.१०/०४/२०२४ पर्यंत आहे.<br>सदर जाहिरातीच्या अनुषंगाने विहित कार्यवाही करुन संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण या पदासाठी प्राप्त होणाऱ्या आवेदनपत्रांमधून पात्र ठरणाऱ्या उमेदवारांची मुलाखत घ्यावी लागणार आहे. सदर मुलाखती घेण्यासाठी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम १०५ (२) मधील तरतुदीनुसार निवड समिती गठीत करावी लागणार आहे. सदर निवड समितीला अनुसरुन १०५ २) (ड) मध्ये खालीलप्रमाणे तरतुद विहित केलेली आहे.<br>• व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशित करावयाचा, व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक<br>उपरोक्त तरतुदीच्या अनुषंगाने संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेचा सदस्य असलेला एक निर्वाचित प्राचार्य किंवा अध्यापक यांचे व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करणे आवश्यक आहे.<br>सबब, महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२)(ड) मधील तरतुदीनुसार संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषदेने नामनिर्देशन करावयाची बाब विचारार्थ. | आस्थापना विभाग |
| ठराव: | **महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम १०५(२) (ड) मधील तरतुदीनुसार संचालक, क्रीडा व शारिरीक शिक्षण या पदाच्या निवड समितीवर व्यवस्थापन परिषद सदस्य डॉ. सुशील कुमार शिंदे यांचे सर्वानुमते नामनिर्देशन करण्यात आले.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०८] | प्रस्तुत विद्यापीठास सद्य:स्थितीत कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) पुरवठा करणारे कंत्राटदार मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर यांना मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी देण्यात आलेली मुदतवाढ दि.३१/०३/२०२४ रोजी समाप्त होत असल्याने व सद्य:स्थितीत मा.निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूका २०२४ च्या अनुषंगाने दि.१६/०३/२०२४ पासून देशभरात आचारसंहिता लागू केलेली आहे. त्यामुळे सदरची ई-निविदेची प्रक्रिया करता येणार नसल्याने मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर यांना दि.०१ एप्रिल, २०२४ पासून ई-निविदाची प्रक्रिया पूर्ण होऊन नविन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ.<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठास सन २०२३-२४ साठी खासगी कंत्राटदारामार्फत विविध पदनामाचे कंत्राटी मनुष्यबळ घेण्यासाठी ई-निविदाची प्रक्रिया करण्यासाठी आस्थापना विभागाकडून दि.१८/१२/२०२३ च्या टिपणीन्वये व दि.२८/०२/२०२४ च्या टिपणीन्वये नविन खासगी कंत्राटदाराकडून कंत्राटी मनुष्यबळाची सेवा विद्यापीठ कार्यालयास घेण्यासाठी नविन मनुष्यबळ पुरवठादारांचे नाव कळविण्याबाबत वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागास कळविण्यात आलेले आहे. तसेच व्यवस्थापन परिषदेच्या दि.१५ सप्टेंबर, २०२३ च्या बैठकीमध्ये झालेल्या ठरावाच्या अनुषंगाने व आस्थापना विभागाच्या दि.२७/०९/२०२३ रोजीच्या प्रशासकीय मान्यतेच्या अनुषंगाने मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर यांना विद्यापीठ कार्यालयाच्या जा.क्र. पुअहोसोविसो/आस्था/ २०२३/७१२२, दि.३०/०९/२०२३ च्या पत्रान्वये ई-निविदेची प्रक्रिया सुरु असल्याने दि.०१/१०/२०२३ पासून सहा महिने (दि.०१/१०/२०२३ ते दि.३१/०३/२०२४ पर्यंत) अथवा ई-निविदेची प्रक्रिया पूर्ण होऊन नविन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंत यापैकी जे अगोदर घडेल त्याकालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कनुसार मुदतवाढ देण्यात आल्याबाबत कळविण्यात आले होते.<br>सदरची देण्यात आलेली मुदत दि.३१/०३/२०२४ रोजी समाप्त होणार आहे व सद्यस्थितीत वित्त व लेखा (खरेदी व भांडार) विभागामार्फत ई-निविदेची प्रक्रिया चालू आहे. तथापि मा. निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा | आस्थापना विभाग |

| | | |
|---|---|---|
| | सार्वत्रिक निवडणूका २०२४ च्याअनुषंगाने दि.१६/०३/२०२४ पासून देशभरात आचारसंहिता लागू केलेली आहे. त्यामुळे सदरची ई-निविदेची प्रक्रिया करता येणार नाही. सदर बाब विचारात घेता सद्यस्थितीत प्रस्तुत विद्यापीठ कार्यालयास कंत्राटी मनुष्यबळ पुरवठा करणारे खासगी कंत्राटदार यांना दि.०१ एप्रिल, २०२४ पासून ई-निविदाची प्रक्रिया पूर्ण होऊन नविन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कनुसार मुदतवाढ देणे आवश्यक आहे.<br>सबब, प्रस्तुत विद्यापीठास सद्यस्थितीत कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) पुरवठा करणारे कंत्राटदार मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर यांना मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी देण्यात आलेली मुदतवाढ दि.३१/०३/२०२४ रोजी समाप्त होत असल्याने व सद्यस्थितीत मा. निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूका २०२४ च्याअनुषंगाने दि.१६/०३/२०२४ पासून देशभरात आचारसंहिता लागू केलेली आहे. त्यामुळे सदरची ई-निविदेची प्रक्रिया करता येणार नसल्याने खासगी कंत्राटदार मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि. नागपूर यांना दि.०१ एप्रिल, २०२४ पासून ई-निविदाची प्रक्रिया पूर्ण होऊन नविन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कनुसार मुदतवाढ देण्याची बाब विचारार्थ. | |
| ठराव: | **प्रस्तुत विद्यापीठास सद्य:स्थितीत कार्यालयीन कामासाठी कंत्राटी पध्दतीने मनुष्यबळ (एकत्रित वेतन, कुशल, अर्धकुशल व अकुशल) पुरवठा करणारे कंत्राटदार मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर यांना मनुष्यबळ पुरवठा करण्यासाठी देण्यात आलेली मुदतवाढ दि.३१/०३/२०२४ रोजी समाप्त होत आहे व सद्य:स्थितीत मा.निवडणूक आयोग, भारत सरकार यांनी लोकसभा सार्वत्रिक निवडणूका २०२४ च्या अनुषंगाने दि.१६/०३/२०२४ पासून देशभरात आचारसंहिता लागू केलेली आहे. त्यामुळे सदरची ई-निविदेची प्रक्रिया पूर्ण करता येणार नसल्याने मे. सिंग कमांडो सिक्युरिटी फोर्स प्रा. लि., नागपूर यांना दि.०१ एप्रिल, २०२४ पासून ई-निविदाची प्रक्रिया पूर्ण होऊन नवीन कंत्राटदार नियुक्त होईपर्यंतच्या कालावधीसाठी पूर्वीच्याच सेवाशर्ती व सेवाशुल्कानुसार मुदतवाढ देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ०९ ] | **विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरापैकी २७२ एकर परिसर वन मंजुरी (Forest Clearance) करण्याचे काम, अंदाजपत्रक तयार करण्याचे काम व कामाची देखरेख करण्यासाठी कन्सलटंट यांची नेमणूक व कन्सलटंट फी आदा करण्याची बाब विचारार्थ.** | अभियांत्रिकी विभाग |

टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरापैकी २७२ एकर परिसर इतके जमिन वन विभागाने राखीव वन क्षेत्र म्हणून घोषित केलेले आहे. सदरची जमिन विद्यापीठाच्या मालकीची असल्याने वन विभागाकडून अराखीव वन क्षेत्र करण्यासाठी विद्यापीठाकडून पाठपुरावा करुन वन विभागाकडून अराखीव वन क्षेत्र करणे आवश्यक आहे. विद्यापीठाच्या २७२ एकर जमिनीवर विद्यापीठाकडून विद्यार्थ्यांना सोई सुविधा पुरविण्यासाठी वन विभागाकडून राखीव वन क्षेत्र काढून आराखीव वन क्षेत्र करणे आवश्यक आहे.

विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरापैकी २७२ एकर परिसर वन मंजुरी (Forest Clearance) करण्याचे काम, अंदाजपत्रक तयार करण्याचे काम व कामाची देखरेख करण्यासाठी विद्यापीठाच्या नियुक्त केलेल्या वास्तुविशारद यांची नेमणूक करणे आवश्यक आहे.

सदर ४८२ एकर परिसरापैकी २७२ एकर परिसर वन मंजुरी (Forest Clearance) करण्याच्या कामासाठी मे. सांची फोरेस्ट ॲन्ड इंजिनिअरींग कन्सलटंट प्रा. लि., पुणे यांच्याकडून संदर्भ क्र.०१ अन्वये व मे. डॉ. उज्जल पाटील कन्सलटंट, पुणे यांच्याकडून संदर्भ क्र.२ अन्वये विद्यापीठास संदर्भिय दरपत्रक प्राप्त झाले आहे. सदर प्राप्त दोन्ही दरपत्रकातील तपशील व अंदाजपत्रकीय रक्कम खालील तक्त्याप्रमाणे देण्यात आली आहे.

मे. सांची फोरेस्ट ॲन्ड इंजिनिअरींग कन्सलटंट प्रा. लि. पुणे

| Sr. No. | Details of Works | Qty | Rate | Amount of Rs. |
|---|---|---|---|---|
| 1) | Net Present Value of Forest Land | 15.44 | 9,57,780/- | 1,47,88,123/- |
| | Calculated @ Rs.9,57,780 X Area 39.72 Ha. = 3,80,43,021.60 X 5 = 19,02,15,108/- As per Govt. of Maharashtra File No.5-3/2011-FC (Vol- I) Dated 06/01/2022. | 15.44 | 8,04,884/- | 1,24,27,409/- |
| 2) | Compensatory | 53.62 | 9,57,780/- | 5,13,56,164/- |
| | A forestation Abstract for model No.5 @ Rs.8,04,884 X 39.72 Ha = 3,19,69,992.48 | 53.62 | 8,04,884/- | 4,31,57,880/- |
| | Total Amount of Rs.= | | | 12,17,29,576/- |
| | Consultancy Fee of Rs.= | | | 74,50,000/- |
| | Grand Total Amount of Rs.= | | | 12,91,79,576 |

| मे. डॉ. उज्जल पाटील कन्सलटंट, पुणे | | |
|---|---|---|
| Sr. No. | Financial Proposal | Amount |
| 1) | Payment Stage Schedule | 1,55,00,000.00 |
| | • Stage I (Principal Clearance) | |
| | • Stage II (Final Clearance) | |
| 2) | Technical and Financial Proposal for obtaining the wildlife forest Clearance | |
| | A. Technical Proposal | |
| | work plan and wildlife clearance | |
| A. | Financial Proposal | 80,00,000.00 |
| | Payment Schedule for wildlife clearance | |
| | Consultancy Fee | 2,35,00,000.00 |

| Sr. No. | Details | Cost |
|---|---|---|
| 1 | Cost towards the NPV (Eco-Value Class III) @ 9,57,780/- per hector (111 Hector) | 10,63,13,580.00 |
| 2 | Compensatory Afforest ration for model No.3 for 10 Year @ 8,04,884/- per hector X 2 | 8,93,42,120.00 |
| 3 | Penal Compensatory Afforest ration for model No.3 for 10 Years @ 8,04,884/- per hector X 2 | 17,86,84,240.00 |
| 4 | Cost of Survey and demarcation and erection of pillars @ 12,500/- per Pillars Total: 1200 Pillars | 1,50,00,000.00 |
| 5 | Creation of water bodies in CA Land @ 14.00 Lakhs per water bodies 15 Nos | 2,10,00,000.00 |
| 6 | Cost of Wildlife Conservation Plan | 2,50,00,000.00 |
| 7 | Cost of Compensatory Afforest ration Land, this cost is need to be paid to the Collector Concern @ 8,30,000/- | 92,130,000.00 |
| | Total | 52,74,69,940.00 |
| | Cost of wildlife Protection as per wildlife Proposal after clearance @ 2% of Project Cost= | |
| | Grand Total | 55,09,69,940.000 |

सबब, विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरापैकी २७२ एकर परिसर वन मंजुरी (Forest Clearance) करण्याचे काम, अंदाजपत्रक तयार करण्याचे काम व कामाची देखरेख करण्यासाठी फॉरेस्ट कन्सलटंट यांची नेमणूक व कन्सलटंट फी आदा करण्याची बाब विचारार्थ.

**ठराव:** **विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरापैकी २७२ एकर परिसर वन मंजुरी (Forest Clearance) करण्याचे काम, अंदाजपत्रक तयार करण्याचे काम व कामाची देखरेख करण्यासाठी कन्सलटंट यांची नेमणूक करण्यासाठी ई-निविदा (E-Tender) मागविण्यास व त्यासाठी रु.४ लक्ष अंदाजपत्रकीय तरतूद करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १० ] | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे ०१ एप्रिल किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्याकरिता शिफारस करण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता संलग्नित महाविद्यालयांकडून सोबत जोडलेल्या विवरणपत्रान्वये पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्ताराचे एकूण २९ प्रस्ताव प्राप्त झाले आहेत.<br>उपरोक्त प्राप्त प्रस्तावांवर महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीनूसार अधिष्ठाता मंडळाची शिफारस व व्यवस्थापन परिषदेस असणे आवश्यक आहे. व्यवस्थापन परिषदेच्या शिफारशीनंतर प्राप्त प्रस्तावांवर विद्यापीठ स्तरावरून विहित कार्यवाही करून पुढील कार्यवाहीस्तव विहित नमुन्यात दरवर्षी प्रमाणे शिखर संस्था व महाराष्ट्र शासनाकडे १ एप्रिल किंवा त्यापूर्वी सादर करणे आवश्यक आहे.<br>सबब, शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्ताव दरवर्षीप्रमाणे १ एप्रिल किंवा त्यापूर्वी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्यासाठी अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्याकरिता शिफारस करण्याची बाब विचारार्थ. | संलग्नता विभाग |
| ठराव: | **शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता पारंपारिक व व्यावसायिक अभ्यासक्रमांचे नैसर्गिक विस्तारासाठी संलग्नित महाविद्यालयांकडून प्राप्त झालेले प्रस्तावास महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ कलम ११५ व १०९ (४) (ग) मधील तरतूदीन्वये अधिष्ठाता मंडळाने केलेली शिफारस स्विकारुन नैसर्गिक विस्ताराचे प्रस्ताव शिखर संस्था व राज्य शासनाकडे पाठविण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ ११ ] | **प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने मा. संर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथील न्यायालयीन फी बाबतची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथील विविध प्रकरणांमध्ये कामकाज पाहण्यासाठी वकीलांचे पॅनल गठीत करण्यात आलेले नाही. त्या त्या वेळी परिस्थितीनुसार ॲड. श्री. प्रसांथ पी., ॲड. श्रीमती के. व्ही. भारती उपाध्येय, व ॲड. श्री. रविंद्र अडसुरे यांना विद्यापीठाच्या वतीने कामकाज पाहण्यासाठी नियुक्त करण्यात येऊन त्या त्या वेळी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील वकीलांना व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या फी नुसार जादाची फी अदा करण्यात येत होती व आहे.<br>त्यानुसार सद्य:स्थितीमध्ये मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथील प्रकरणांसाठी मा. उच्च न्यायालय, मुंबई येथील पॅनल ॲडव्होकेट यांना व्यवस्थापन परिषदेने मान्य केलेल्या फी नुसार रु.३५,०००/- प्रमाणे व्यावसायिक फी अदा करण्याची बाब विचारार्थ सादर. तसेच सद्य:स्थितीत प्रस्तुत विद्यापीठासाठी संपादित करण्यात आलेल्या ४८२ एकर जमिनीचा मोबदला वाढवून मिळण्याबाबत सोलापूर येथील मे. दिवाणी न्यायालयात दाखल करण्यात आलेल्या २९ प्रकरणांमध्ये मे. दिवाणी न्यायाधीश, सोलापूर यांनी वाढीव मोबदला देण्याबाबत दिलेल्या आदेशाविरुध्द प्रस्तुत विद्यापीठाने मा. उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल केलेल्या २९ प्रथम अपिल व त्यामध्ये दाखल करण्यात आलेल्या क्रॉस अपिल निकाली झालेले आहेत. सदर २९ प्रथम अपिल व क्रॉस अपिलमध्ये मा. उच्च न्यायालयाने पारित केलेल्या निर्णयाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे S.L.P. दाखल करण्यासाठी प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने ॲड. श्री. रविंद्र अडसुरे यांच्यामार्फत २९ S.L.P. प्रकरणे दाखल करण्याची कार्यवाही मा. कुलगुरु यांच्या आदेशानुसार सुरु आहे. या प्रकरणी प्रती प्रकरण रु.३५,०००/- प्रमाणे एकूण फी रु.१०,१५,०००/- होते. या प्रकरणी ॲड. श्री. अडसुरे यांच्यासोबत चर्चा करण्यात येऊन विद्यापीठ हिताच्या अनुषंगाने व विद्यापीठ हे profiteering संस्था नसल्याने सदर फी मधून योग्य ती फी ची रक्कम कमी करण्याबाबत विनंती केली असता, त्यांनी रु.९,००,०००/- इतकी रक्कम सदर २९ S.L.P. प्रकरणांसाठी व्यवसायिक फी पोटी स्वीकारण्यास संमती दर्शविलेली आहे.<br>सबब, सदरची बाब व्यवस्थापन परिषदेच्या विचारार्थ. | कायदा विभाग |
| ठराव: | **विषयात नमूद प्रमाणे प्रस्तुत विद्यापीठाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे वकील नियुक्त करुन फी अदा करण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.**<br>**तसेच विद्यापीठाच्या वतीने मा. सर्वोच्च न्यायालय, दिल्ली येथे ॲड. श्री. रविंद्र अडसुरु यांच्या मार्फत २९ S.L.P. प्रकरणे दाखल करण्यास व याकरिता त्यांना व्यावसायिक फी पोटी रु.९,००,०००/- रक्कम देण्यास व इतर खर्च स्वतंत्र देण्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

| अ.क्र. | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [ १२ ] | **महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र सल्लागार मंडळ सदस्यांकरिता त्रिसदस्य समितीच्या दि.१२/०२/२०२४ रोजीचा अहवाल मान्यतेस्तव.**<br>टिपणी: त्रिसदस्यीय समितीने महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र तज्ञ सल्लागार मंडळाच्या सदस्याकरिता खालीलप्रमाणे सदस्यांची नावे निवड करुन शिफारस केले आहे. तसेच सदर तज्ञ सल्लागार मंडळाची मुदत तीन वर्षाकरिता राहील अशी शिफारस केली आहे. | महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र |

| अ.क्र. | पदनाम | नामनिर्देशन |
|---|---|---|
| १ | मा. कुलगुरु | प्रा. (डॉ.) प्रकाश महानवर |
| २ | मा. प्र-कुलगुरु | प्रा. (डॉ.) लक्ष्मीकांत ब. दामा |
| ३ | मा. कुलसचिव | योगिनी घारे |
| ४ | मा. वित्त व लेखा अधिकारी | सीए. श्रेणिक शाह |
| ५ | अधिष्ठाता, मानवविज्ञान विद्याशाखा | डॉ. वसंत कोरे |
| ६ | महात्मा बसवेश्वरांच्या साहित्य संबंधित उल्लेखनिय कार्य करणारे एक वरिष्ठ विचारवंत | डॉ. विरुपाक्ष शिवाचार्य स्वामीजी गुरु पंचाक्षर शिवाचार्य महास्वामीजी, बीड |
| ७ | महात्मा बसवेश्वराचे कार्य करणारे राज्यातील कन्नड/इंग्रजी/मराठी जाणकार अभ्यासक | प्राचार्य गजानन रेवणसिध्द धरणे, सोलापूर |
| ८ | महात्मा बसवेश्वरांच्या साहित्यावर कार्य करणारे एक महिला तज्ज्ञ संशोधक | श्रीमती स्वामी माधव महाळंक, पुणे |
| ९ | महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचे कार्य कन्नड, मराठी, इंग्रजी साहित्याचे अनुवाद करणारे तज्ज्ञ अनुवादक | श्री. प्रदीप संगप्पा कंनाळ, अक्कलकोट |
| १० | महात्मा बसवेश्वर विचारांचे कार्य करणारे एक समाजचिंतक | डॉ. राजेंद्र सोमशंकर घुली, सोलापूर |
| ११ | महात्मा बसवेश्वर कार्यावर संशोधन करणारे एक समाजचिंतक | श्री.ह.भ.प.देवव्रत विवेकानंद वासकर महाराज, पंढरपूर |
| १२ | महात्मा बसवेश्वर कार्यावर संशोधन करणारे राज्यशास्त्र अभ्यासक | श्री. सुरेश तुकाराम शहापूरकर, सोलापूर |
| १३ | महात्मा बसवेश्वरांच्या वचन विचारांचा प्रसार करणारे युवा अभ्यासक | श्री. राहूल रमेश पावले, सोलापूर |
| १४ | महात्मा बसवेश्वरांच्या विचारांचे कार्य करणारे एक समाजचिंतक | श्री. महादेव विठ्ठल न्हावकर, सोलापूर |
| १५ | सदस्य सचिव, प्र.संचालक, महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र | डॉ. प्रभाकर कोळेकर |

| | | |
|---|---|---|
| | सबब, महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र सल्लागार मंडळ सदस्यांकरिता त्रिसदस्य समितीच्या दि.१२/०२/२०२४ रोजीचा अहवाल मान्यतेस्तव. | |
| ठराव: | **महात्मा बसवेश्वर अध्यासन केंद्र सल्लागार मंडळ सदस्यांकरिता त्रिसदस्य समितीचा दि.१२/०२/२०२४ रोजीचा अहवाल स्विकारुन त्यास सर्वानुमते मान्यता देण्यात आली.** | |

श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी खालीलप्रमाणे आयत्या वेळेचा विषय सादर केला.

| अ.क्र | विषय / बाब | विभाग |
|---|---|---|
| [१३(१)] | **प्रत्येक महाविद्यालयात ज्याप्रमाणे वेगवेगळ्या विषयाचे विभागप्रमुख पदे असते, त्याचप्रमाणे ग्रंथपाल पदास ग्रंथालय विभागप्रमुख म्हणून मान्यता देण्याची बाब विचारार्थ.**<br>टिपणी: व्यवस्थापन परिषद सदस्य श्री. सचिन मारुती गायकवाड यांनी दि.२२/०३/२०२४ रोजीच्या पत्रान्वये खालील विषय आयत्या वेळेचा विषय पत्रिकेत घेणेबाबत विनंती केली होती.<br>प्रत्येक महाविद्यालयात ज्याप्रमाणे वेगवेगळ्या विषयाचे विभागप्रमुख पद असते, उदा. मराठी विभागप्रमुख, इंग्रजी विभागप्रमुख, इतिहास विषयाचा विभागाचे इतिहास विभागप्रमुख, त्याचप्रमाणे ग्रंथपाल पदास ग्रंथालय विभागप्रमुख म्हणून मान्यता देण्यात यावी असा ठराव व्यवस्थापन परिषदेस सादर केलेला आहे. त्यासाठी स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड यांच्या दि.०३/०२/२०२३ रोजीच्या अधिसभा बैठकीत ठरावाचा संदर्भ दिलेला आहे. यानुसार महाविद्यालयातील ग्रंथपाल पदास विभागप्रमुख म्हणून आदेश निर्गमित करण्याबाबत विद्यापीठ परिनियम S.२५० नुसार योग्य ती कार्यवाही नियमानुसार करण्यात यावी असे कळविले आहे. | शिक्षक मान्यता विभाग |
| ठराव: | **सदरचा विषय सविस्तर माहितीसह संबंधित विभागामार्फत विहीत प्रक्रिया करुन त्यानंतर व्यवस्थापन परिषदेच्या बैठकीत सादर करण्यात यावा असे सर्वानुमते ठरले.** | |

<table>
<tr><th>अ.क्र</th><th>विषय / बाब</th><th>विभाग</th></tr>
<tr><td>[१३(२)]</td><td>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठ संकुलांमध्ये/परिसरामध्ये नवीन पदवी व पदव्युत्तर अभ्यासपाठ्यक्रम / विषय, नवीन महाविद्यालय इ. सुरु करण्याची बाब विचारार्थ.</td><td>आस्थापना विभाग</td></tr>
<tr><td>ठराव:</td><td>शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून विद्यापीठ संकुलांमध्ये/परिसरामध्ये नवीन पदवी व पदव्युत्तर अभ्यासपाठ्य / विषय, नवीन महाविद्यालय इ. सुरु करण्यासाठी प्रस्ताव तयार करणेकामी सर्वानुमते खालीलप्रमाणे समिती गठीत करण्यात आली.
<table>
<tr><th>अ.क्र.</th><th>समिती सदस्यांचे नांव</th><th>पद</th></tr>
<tr><td>१</td><td>डॉ. लक्ष्मीकांत बसवराज दामा<br>प्र-कुलगुरु</td><td>अध्यक्ष</td></tr>
<tr><td>२</td><td>डॉ. प्रशांत मारुती पवार<br>प्रभारी अधिष्ठाता-विज्ञान व तंत्रज्ञान विद्याशाखा</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>३</td><td>डॉ. वसंत गुरुशांत कोरे<br>प्रभारी अधिष्ठाता - मानवविज्ञान विद्याशाखा</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>४</td><td>डॉ. शिवाजी विश्वास शिंदे<br>प्रभारी अधिष्ठाता-वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>५</td><td>डॉ. राजशेखर हिरेमठ<br>प्रभारी अधिष्ठाता - आंतर-विद्याशाखीय अभ्यास विद्याशाखा</td><td>सदस्य</td></tr>
<tr><td>६</td><td>श्री. विजय पाटील<br>कक्ष अधिकारी, नवोपक्रम, नवसंशोधन व साहचर्य मंडळ</td><td>सदस्य सचिव</td></tr>
</table>
सदर समितीने तात्काळ बैठक घेऊन अहवाल लवकरात लवकर सादर करावा.</td><td></td></tr>
</table>

मा. कुलगुरु व सर्व सन्माननीय सदस्यांचे आभार मानून अध्यक्षांच्या परवानगीने बैठक संपल्याचे कुलसचिव यांनी जाहीर केले व राष्ट्रगीतानंतर बैठक समाप्त झाली.

सदस्य सचिव
व्यवस्थापन परिषद

अध्यक्ष
व्यवस्थापन परिषद